**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 313 (CCCXIII)
ISSN : 2278-9308
August, 2021

# आदिवासींच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्या.

डॉ. आर. व्ही. मोरे
समाजशास्त्र विभाग,स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड. जि. वाशिम

**सारांश :—**

आरोग्य म्हणजे सामाजिक भुमिका समर्थपणे निभावण्यासाठी लागणारी संपूर्ण तंदरूस्ती, संस्कृतीच्या आर्थिक, राजकिय, सामाजिक, धार्मिक अंगाप्रमाणे शारीरिक, मानसिक आरोग्य सुध्दा महत्वाचे आहे. व्यक्तीच्या आरोग्याचा त्याच्या संस्कृतीमधील धार्मिक श्रध्देशी किंवा अंधश्रध्देशी संबध असतो. आदिवासी समाजात वनस्पतीजन्य किंवा आधुनिक औषधे अशा विविध उपचार पध्दती समाजात अस्तित्वात आहेत. तंत्र—मंत्र आणि धार्मिक उपचारही विशेषत: आदिवासी समाजात आढळतात. प्रत्येक समाजात औषधोपचार करणारे व्यावसायीक असतात. त्याप्रमाणे आदिवासी भागात 'भगत' किंवा वैदू यांचा प्रभाव दिसून येतो. कारण त्यांना जंगलातील वनस्पतीची चांगली माहिती असते. त्याचप्रमाणे ते उपचारासाठी ते तंत्र—मत्रांचाही वापर करतात. तसेच ते नात्या गोत्यातलचे असतात,आणि उपचारासाठी ते कायम सापडतात. त्यामुळे त्याच्यावर विश्वास असतो. योग्य तो उपचार योग्य त्या वेळी न मिळाल्यामुळे व अशिक्षित असल्यामुळे आदिवासीमध्ये आरोग्याविषयक तसेच शैक्षणिक समस्या मोठया प्रमाणात आढळतात.

**प्रस्तावना :—**

कोणत्याही समाज सुधारणेचा पाया शिक्षण हा आहे. मागासलेल्या समाजात शिक्षण नसेल तर आर्थिक किंवा सामाजिक प्रगती साठी कितीही प्रयत्न केले तरी ते निष्फळ ठरतात. ज्या समाजाची सुधारणा करावयाची त्या समाजाला जो पर्यंत केल्या जाणा—या सुधारणेचे महत्व पटत नाही. तोपर्यंत त्या सुधारणा बाहेरून लादल्या सारख्या होतात व अल्पजिवी ठरतात. सुधारणेच्या नव कल्पनांनी ज्यांची प्रगती करावयाची त्यांच्या मनाची एकदा पकड घेतली की त्या कल्पना शक्तीशाली बनतात. आणि मग ख—या अर्थाने प्रगतीला सुरूवात होते. अशाप्रकारे सुरू झालेल्या प्रगतीचा प्रवाह मग कोणीही अडवू शकत नाही. ही गोष्ट फक्त शिक्षणानेच साध्य होण्यासारखी आहे, पण हे सर्व व्हावयाचे तर प्रथम त्या समाजात शिक्षणाची गोडी निर्माण व्हावयास पाहिजे आणि सर्वात कठीण काम म्हणजे मागासलेल्या आदिवासी समाजात शिक्षणाची आवड व आस्था निर्माण करणे हे होय.

मनुष्य बळाच्या विकासासाठी हे महत्वाचे संप्रेरक आहे. त्याच्या अभावामुळेच आदिवासीचे शोषण होत गेले आणि त्यांची अवस्था हालाखीची बनत गेली. आदिवासी करीता शिक्षण हा प्रगतीच्या दिशेने नेणारा दरवाजा आहे. शिक्षण ज्ञानाचा प्रसार करते. निक्षरतेमुळे किंवा अज्ञानामुळे आदिवासींना नविन आर्थिक संधीचा फायदा घेणे शक्य नाही. मात्र विकास प्रक्रियेचा प्रभावाने आदिवासी क्षेत्र खुली करण्यात आल्यामुळे दोन स्वतंत्र मुल्यांव्दारे समस्यांचा समन्वय झाला. एक म्हणजे परंपरा आणि अज्ञान यावर आधारित तर दुसरी तंत्रज्ञान आणि नविन अविष्कारांवर आधारित या दोन्ही अवस्थांचा सलोखा पुर्ण संबंध प्रस्थापित होणे हे आदिवासी लोकांच्या दुष्टीने महत्वाचे आहे. शिक्षणाचा प्रसार करतांना आदिवासीं बालकांना विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नविन शोधांची माहिती देणे तसेच आर्थीक, राजकिय घडामोडींबद्दल त्यांना जागरूक करणे आवश्यक आहे. आदिवासी विद्यार्थ्यामध्ये आर्थिक दुर्बल परिस्थितीमुळे न्युनगंड तयार झालेला असल्याचे आढळून

येते. गरिबीमुळे ही मुले इतर सर्वसामान्य मुलांमध्ये मिसळू शकत नाही. शिक्षण हे आपल्यासाठी नाही अशी त्यांची मानसिकता तयार झालेली असते. जंगल हेच विश्व मानलेले आहे. आदिवासींबरोबरच त्यांची मुले ही त्याच मानसिक परिस्थितीत जगतात. पालकांबरोबरच या बालकांमध्येही रूढी परंपरेनुसार आपोआप अंधश्रध्दा निर्माण होवून त्यांचाही विकास खुंटण्याची शक्यता अधिक असते. अशावेळी शिक्षण हे त्यांच्या साठी मोलाचे ठरते.

प्रोढ आदिवासी बरोबरच मुलेही जंगलात दिवसरात्र भटकंती करतात. टोळी — टोळीने फिरून शिकार करणे, पक्षी मारणे व त्यासाठी दिवसरात्र फिरत राहणे. हे मुल देखील पसंत करतात, मात्र त्यामुळे त्यांचे भविष्य अंधा—या कोठडीत बंद होवून जाते. अशावेळी या मुलांना शिक्षणाची नितांत गरज भासते.

तसेच आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीच्या बाबतीत शिक्षणानंतर सार्वजनिक आरोग्य ही महत्वाची बाब समजली जाते. आदिवासीच्या सामाजिक सुधारणेच्या मार्गात आरोग्य विषयक नियमांची व औषधोपरांविषयीची अनास्था हा एक मोठा अडथळा आहे. स्वच्छतेची राहणी, शुध्द व पोटभर आहार ही सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या साधनांपैकी दोन साधने आहेत. परंतु आदिवासीचे बहुतेक सर्व सामाजिक प्रश्न आर्थिक परिस्थितीशी निगडीत असल्यामुळे आदिवासींना स्वच्छतेची राहणी, समतोल आणि पोटभर आहार मिळत नाही. जिथे पिण्याच्या पाण्याची सोय नाही तिथे शुध्द आणि मुबलक पाणी कसे मिळणार? जिथे उपाशीपोटी दिवस काढावे लागतात. तिथे समतोल व पोटभर आहार कुठुन मिळणार? गरिबीमुळे आदिवासींना पिण्याच्या पाण्याची आणि पोटभर अन्नाची सोय आजपर्यंत करता आली नाही. अलिकडे शुध्द व मुबलक पाणी पुरवठा करणा—या आदिवासींच्या आरोग्यविषयक विविध समस्या सोडविणा—या योजनांकडे शासनाने लक्ष वेधले आहे. त्यामुळे आदिवासींच्या आरोग्य विषयक समस्या सुटतील असा आशावाद निर्माण झाला आहे.

**१. इंग्रज येण्यापूर्वीचे शिक्षण :—**

आपल्या देशात शिक्षणाची परंपरा फार जुनी आहे. शिक्षण क्षेत्रात याज्ञवल्क्य, व्यास, मुनी. वाल्मीकी, शंकराचार्य वगैरे ॠषीमुनींनी आणि धर्म मार्तंडाने आयुष्यभर धर्मशिक्षणाचे कार्य केले. शिक्षणाची ही परंपरा ब्रिटिश लोक भारतात येईपर्यंत अनेक संत महंत, धर्म मार्तंड आणि आचार्यांनी चालविली होती. पण ही विद्या फक्त पुरोहीत वर्गाची, फार तर क्षत्रीयांची साधना आहे. अशी धार्मिक भावना त्यावेळी प्रचलित असल्यामुळे शुद्र, दास, अस्पृश्य आदिवासी यांच्या शिक्षणाचा प्रश्नच त्यावेळी उपस्थित झाला नाही. त्यांच्यासाठी शिक्षणाची व ज्ञानाची दारे धर्माने बंद केलेली होती. ब्रिटिशपुर्व काळात आपल्या देशात क्षत्रियांची निरनिराळी राज्य होती परंतू त्यांच्यात अपसात नेहमी भांडणे असत. लढाया चालत. त्यामुळे खेडोपाडी विखुरलेल्या व बहुजन म्हणून गणलेल्या समाजाच्या शिक्षणाकडेही त्यांनी लक्ष दिलेले नव्हते. अस्पृश्य आणि आदिवासी, मागासलेल्यातले आति मागासलेले त्यांची स्थिती तर भयानक होती.

**२. इंग्रज आल्यानंतरचे शिक्षण :—**

इंग्रज आल्यावर आपल्या देशातील परंपरागत चालत आलेली स्थिती बदलू लागली. पुरोहित वर्ग आणि उच्च वर्ग या देशातील दिनदुबळया, गरिब जनतेची पिळवणूक करीत असत. अज्ञान, अंधश्रध्दा आणि रूढींच्या वरवंटयाखाली आदिवासी पदोपदी चेचले जात होते. ही सामाजिक परिस्थिती लक्षात आल्यावर हया लोकांसाठी काही करावे असे इंग्रज सरकारला वाटू लागले. आणि हळूहळू ब्रिटिश राजवटीने देशात राजकिय एकसुत्रिपणा प्रस्थापित केल्यावर इंग्रजांनी या देशात प्रथम इंग्रजी शिक्षण देण्यास सुरूवात केली. या शिक्षणाच्या सवलतीचा फायदा पुन्हा उच्च वर्गच घेवू लागला. ही गोष्ट खरी पण त्यानंतर धर्मरूढीच्या झारेतुन मिळणा—या शिक्षणाहून निराळे व नवे

ISSN : 2278-9308
August, 2021

विचार प्रस्तृत होवू लागले. ब्रिटिश राजवटीला स्थिरता येवू लागल्यावर राज्यकारभारात सुसुत्रता, आणण्याच्या दृष्टीने जमिन महसूल, जंगल आणि लोकगणना इत्यादी विषयासंबधीचे इंग्रजांनी कायदे केले. त्यांची अमंलबजावणी करणाच्या उद्देशाने ब्रिटिश अधिकारी व निरनिराळया शासकिय खात्यातील नोकरवर्ग यांचा जंगलात राहणा—या आदिवासी जमाती बरोबर पुढे वारंवार संबंध येवू लागला. पुढे खिश्चन मिशन—यांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी विपेत:हा उत्तर पुर्व भारतात आदिवासी भागात इंग्रजी शाळा सुरू केल्या.

**३. शिक्षणाला गौण स्थान : —**

आदिवासी मुलांना घरातील कामात सहभागी व्हावे लागते. वस्त्या व पाडयावर कुठे घरांना दारे आहेत तर कुठे नाहीत. घर व लहान भावंडाना साभाळण्यासाठी मोठी मुले यांना घरी थांबावे लागते. त्यामुळे ते शाळेत जावू शकत नाही. आई वडिलांना वर्षभर शेतीचे किंवा मजुरींचे काम मिळतेच असे नाही. पण कधी मजुरांसाठी तर कधी जंगलातून सरपण आणणे, पाणी आणणे, झोपडीसाठी गवत, लाकडे वैगरे गोळा करणे. इत्यादी घरांची कामे करण्यासाठी म्हणूनच नेहमी ब्राहेर रहावे लागते. मजुरींच्या कामाशिवाय जंगलातील लाकडे पाने, महूफुले वैगरे वस्तू आणून विकणे, जंगलातील लाकूड बांबुंची ने—आण करणे वैगरे कामे लोकांना करावी लागतात.

अशा अनेक कारणांनी आईवडील बाहेर असतात. त्यामुळे मुलांना घर साभांळावे लागते परिणामी ते शिक्षण घेवू शकत नाही. आदिवासी मुले दिवसभर जंगलात गुरे चारने, फळे मुळे गोळा करण्यासाठी फिरत राहतात. मुले आई वडिलांना मदत करतात. अल्पवयात ही मुले घरातील जबाबदारी उचलतात. वाटयाला येईल ती जबाबदारी उचलतात त्यामुळे ती शिक्षणापासून वंचित राहतात.

**४. शिक्षणाविषयी नावड, सुप्त गुणांना वाव नाही.**

आदिवासी मुलांच्या स्वभावाचे निरीक्षण केले असता ही मुले भोळी, भाबडी, प्रेमळ, चपळ, व काटक असतात. त्यांना ना उन पावसाची भिती, ना जंगली जनावरांची. दिवसभर गुरा ढोरांच्या मागे रानात भटकत असतात. पोटाची खळगी भरण्यासाठी कंद,.मुळे, फळे गोळा करण्यासाठी दिवसभर जंगलात फिरत असल्यामुळे शाळेत जाणे शक्य नाही. व आवडतही नाही. शाळेतच न गेल्यामुळे आदिवासींच्या सुप्त गुणांना वाव मिळत नाही. आदिवासीं मुले बुध्दीने मुळीच कमी नाहीत. पण त्यांच्या जिज्ञासूपणाला चालना देवून त्यांच्यात शिक्षणाविपयी आवड निर्माण केली पहिजे.

**५. शिक्षकांची उदासिनता :—**

शिक्षण संपादनात यश मिळवण्यासाठी पालकांच्या वृत्ती इतकीच महत्वाची बाब शिक्षकांची असते. निरागस, कोवळया, बालमनावर संस्कार करणे अवघड काम असते. ही कला अवगत होण्यासाठी शिक्षकाला त्याची आवड असणे जरूरीचे असते. आदिवासी विभागात काम करणा—या शिक्षकाच्या संदर्भात तर हे अधिक महत्वाचे आहे. पण आज असे दिसत नाही . प्रशिक्षित, ध्येय वादी तसेच मानवतावादी दृष्टी असलेले शिक्षक आदिवासी भागात नेमण्याऐवजी बिगर प्रशिक्षित नवख्या शिक्षकांचे नेमणुक केल्याने शैक्षणिक कार्यात सर्व बाजुंनी मर्यादा पडतात. आधीच शिक्षणाबद्दल उदासिनता असणा—या आदिवासींमध्ये निरूत्साही शिक्षक गेला म्हणजे त्या शिक्षकांची व शाळेतील विद्यार्थ्यांची काय अवस्था होत असेल याची कल्पनाच नाही.

**६. शिक्षक निवासस्थानाचा अभाव :—**

आदिवासी भागात राहणा—या शिक्षकांसाठी निवासस्थानाची सोय बहुतेक ठिकाणी नाही. त्यामुळे शिक्षकांना गावातील एखाद्या प्रतिष्ठित नागरिक, कारभारी, सरपंच यांच्या कडे सुविधा उपलब्ध होते. अन्यथा शिक्षकाला एखाद्या ग्रामीण कुटूंबाबरोबर थांबावे लागते. परंतू अशावेळी

परिवारासह ग्रामीण भागात राहणे शक्य होत नाही. निवासस्थानाची सोय झाल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणात निश्चितच फरक पडेल.

**आरोग्य विषयक समस्या :—**

**१. शुध्द व मुबलक पाण्याचा अभाव :—**

समतोल आणि पोटभर आहारा संबंधीची आदिवासींची जी स्थिती ती स्थिती शुध्द व मुबलक पाण्यासंबधी ही दिसते. पावसाळयाचे ४ महिने व त्यांनंतरचे २ ते ३ महिने नद्या, नाले, ओढे, झरे, व डवरे, यांना आदिवासी भागात मुबलक पाणी असते. नोव्हेंबर डिसेंबर उजाडला की आदिवासी भागात पाण्याचे दुर्भिक्ष जावू लागते. व ५ ते ६ महिने आदिवासींना पिण्याचे पाणी ही एक समस्या होवून बसते. काही खेंडयामध्ये खड्डे वजा किंवा कच्च्या विहीरी खोदलेल्या असतात. त्या बंदिस्त नसल्यामुळे त्यात पाणी पाचोळा, कचरा, तेथील पाणी हिरवे फिवळे होते. हे अशुध्द पाणी देखील भरपूर प्रमाणात मिळण्याची श्वाश्वती नसते. कित्येक खेडयातील लोकांना पाणी आणण्यासाठी दोन ते चार मैलांपर्यंत लांब जावे लागते. डोंगराची चढ—उतार करावी लागते. चैत्र वैशयाच्या महिन्यात पाण्यासाठी लोक रात्रभर पाणवठयाच्या ठिकाणी बसून राहतात. २—४ तास वेळ घालून शेवटी त्यांना १ —२ हांडे पाणी मिळते अशाप्रकारच्या पाण्यामुळे हगवण, कृमी, जळवा, नारू, कावीळ, कॉलरा, यासारखे महाभयंकर रोग होतात.

**२. स्वच्छ राहणीचा अभाव :—**

आदिवासींना पिण्याच्या पाण्याची टंचाई असते तर इतर वापरासाठी मुबलक पाणी मिळणार कुठून? अशा स्थितीत रोजच्या रोज आंघोळ करणे, कपडे धुणे, लोकांना शक्य नसते. अशा परिस्थितीत वैयक्तीक आरोग्य राखण्याची, कपडे रोजच्या रोज धुण्याची सवय देखील त्यांच्यामध्ये आढळून येत नाही. कपडे धुण्यासाठी लागणा—या पाण्याची मुलत: कमतरता आणि तसेच पाणी मिळाले तर कपडे कमी असल्यामुळे ते वारंवार धुणे शक्य होत नाही. शिवाय धुण्याने ते लवकर फाटतात. अशी त्यांची कल्पना असते. मळकट कपडयामुळे गजकर्ण, खरूज, नायटा इसब इत्यादी, त्वचेचे रोग त्यांच्या आढळतात. आदिवासींच्या घरात जनावरांची देखील सोय केलेली असते. त्यांच्यामुळे जनावरांचे मलमुत्र घराच्या मागच्या बाजूला 'साठते. त्यामुळे साथीचे रोग त्वरीत फैलण्यास त्यांची मदत होते.

**३. आरोग्य आणि औषधोपचार संबधीच्या सोयींचा अभाव :—**

आदिवासी भागात साथीच्या रोगांनी प्रवेश केल्यावर लोकांची स्थिती हलाखीची होते. दवा आणि डॉक्टर यांच्यावर त्यांचा लवकर विश्वास बसत नाही. लोक भक्ताईचे अंगारे धुपारे करत बसतात. साथीच्या रोगाने फारच जोर धरला तर कुठे तालुक्याच्या किंवा दवाखान्याच्या ठिकाणी खबर दिली जाते. जवळपास च्या खेडयात दवाखाना नसतो. आजारी माणसाला दवाखान्यात नेण्याचे ठरविले तर रस्ते निट नसतात. वाहतूकीची सोय देखील नसते, अशा स्थितीत वैद्यकिय मदत मिळेपर्यंत कित्येक लोक रोगाला बळी पडलेले असतात. रोगांचे निवारण करणे किंवा रोगाचा प्रतिबंध करणे, त्यासाठी लागणारी साधणे आणि सोयी आदिवासी भागात उपलब्ध नसतात.

**निष्कर्ष :—**

आदिवासींच्या रोगाचे निवारण करणे किंवा रोगांचा प्रतिबंध करणे त्यासाठी लागणारी साधणे आणि सोय आदिवासी भागात उपलब्ध नसतात आदिवासी विभागात शाळा, वसतीगृहे, आश्रमशाळा चालविणा—या अनेक सामाजिक संस्था आहेत. पण दवाखाने किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र चालविणा—या सामाजिक संस्था मात्र निर्माण झाल्या नाहित. स्वातंत्रोत्तर काळात शासनाने ही जबाबदारी उचललेली आहे. पंचायत राज, आदिवासी विकास गट, क्षेत्रविकास योजना आणि आदिवासी विकास महामंडळ यांच्या मार्फत राबविल्या जाणा—या योजनांव्दारा आदिवासी विभागात

अलिकडे दवाखाने व प्राथमिक आरोग्य केंद्र निघाले आहेत. तालुकाच्या आणि बाजाराच्या गावी अशा सोयी करण्यात येत आहेत. जवळपास आदिवासींना त्यांचा फायदा आज जरूर मिळतो. पण खरा फायदा आदिवासींपेक्षा इतरांनाच अधिक मिळतो. त्याचे एक कारण हे दवाखाने आदिवासींना सोयीच्या अशा ठिकाणी नसतात. शासकीय अधिका—यांच्या व राजकिय पुढा—यांच्या सोयीच्या दृष्टीने त्यांची जागा ठरविण्यात येते. दुसरे असे की आदिवासी भागात मध्यवर्ती खेडयामध्ये हया सोयी नसतात. आदिवासी विभागातील अगदी कडेच्या व विरळ आदिवासी असलेल्या किंवा विभागाबाहेरच्या गावात त्या सुरू होतात. रूग्णालयात आदिवासी रोगी गेला तर त्यांचे अज्ञान, दारिद्रय व त्यांच्याकडे पाहण्याचा इतर समाजाचा दृष्टीकोन त्यामुळे त्यांची व त्याठिकाणची दाद लागणे जवळ जवळ अशक्य असते. सहानुभुतीच्या ओलाव्या ऐवजी त्याला हेटाळणी सहन करावी लागते. त्यामुळे आदिवासींच्या विविध समस्या निर्माण होतात.

संदर्भ ग्रंथ :—

१. डॉ. संगवे विलास :— आदिवासींचे सामाजिक जिवन.
२. प्रा. डॉ. गंगणे वर्षा :— आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्या,ऋुचा प्रकाशन
३. महाजन जयश्री :— आदिवासी समाज संस्कृती आणि आरोग्य, अथर्व प्रकाशन जळगाव.
४. कोडीतकर सुरेश :— आदिवासी जिवन कथा व व्यथा, सुगावा प्रकाशन.
५. चव्हाण मोहन :— आदिवासी साहित्य, अनुग्या बुक्स प्रकाशन.

Principal
Late Pushpadevi Patil Arts & Science College Risod Dist-Washim

IQAC Co-ordinator
Late Pushpadevi Patil Arts & Science College, Ris...

Late Pushpadevi Patil Art's & Sci. College 722 Dist-Washim Risod